## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

**फ प्रभाग समिती**

**सभावृत्तांत ( कार्यपत्रिका क्रमांक 04)**

**दिनांक : 06/01/2022** **वेळ :- सकाळी 11.30 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाची मासिक सभा गुरुवार दि.06/01/2022 रोजीची सकाळी 11.30 वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील **" राजर्षी शाहू महाराज सभागृह "** येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. कुंदन अंबादास गायकवाड | सभापती |
| 2. | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | सदस्या |
| 3. | मा. भालेकर प्रविण महादेव | सदस्य |
| 4. | मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे | सदस्या |
| 5. | मा.पंकज दत्तात्राय भालेकर | सदस्य |
| 6. | मा.उत्तम प्रकाश केंदळे | सदस्य |
| 7. | मा.पवळे सुमनताई मधुकर | सदस्या |
| 8. | मा.चिखले सचिन तुकाराम | सदस्य |
| 9. | मा. दिनेश लालचंद यादव | स्वीकृत सदस्य |
| 10. | मा.संतोष भाऊसाहेब मोरे | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा. सिताराम बहुरे-क्षेत्रिय अधिकारी मा.विजयकुमार काळे–कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.संजय खाबडे-कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.महेंद्र चौधरी-प्रशासन अधिकारी तथा सचिव, मा. शेखर गुरव-उपअभियंता(नगररचना व EWS), मा.हनुमंत .शिंदे- उपअभियंता (स्थापत्य), मा.शहाजी गायकवाड-उपअभियंता (पाणीपुरवठा) मा.सगर पी.व्ही.-उप अभियंता(झोनिपु), मा.योगेश अल्हाट- उपअभियंता (पर्यावरण),मा.सुधिर वाघमारे-प्र.सहा.आरोग्याधिकारी श्री चंद्रकांत सुभाष गोडसे-सहा. उदयान अधिकारी, श्री इदनानी नरेशकुमार-कार्यालय अधिक्षक,श्री स्वामीजंगम जी.डी.-कनिष्ठ अभियंता–(ज. नि.),श्री शेख एस.के.-कनिष्ठ अभियंता(झोनिपु), श्री कोटीयाना डी.एम.-आरोग्य निरिक्षक(पशुवैद्यकीय विभाग), इ.अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.

मा. सभापती, कुंदन अंबादास गायकवाड यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

बैठकीचे सुरुवातीस थोर समाजसेविका अनाथांची माय असलेल्या कै.सिंधूताई सपकाळ यांचे अल्पशा आजाराने निधन झाल्याने त्यांना दोन मिनिटे शांतता पाळून श्रध्दांजली अर्पण केली.

दिनांक ०९/१२/२०२१ रोजी स.११.३० वा. झालेल्या फ प्रभाग समितीच्या मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ३) कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

(कृ.मा.प.)

मा.सभापती व उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभेत दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्रमांक १**-सन्मा.सदस्य उत्तम केंदळे यांचा दिनांक ०६/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

फ प्रभाग समिती सदस्य व ३ अधिकारी यांचा सिक्कीम, दार्जिलिंग,गंगटोक येथे पाहणी व अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत.

फ प्रभाग समिती सदस्यांचे इंदौर अभ्यास दौ-याबाबत झालेला फ प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक २ दिनांक २४/११/२०२१ हा रदद करणेत यावा तसेच फ प्रभाग समिती सदस्य व फ प्रभागातील ३ अधिकारी/कर्मचारी यांचा पाहणी/अभ्यास दौरा सिक्कीम, दार्जिलिंग,गंगटोक या ठिकाणी माहे जानेवारी २०२२ या महिन्यात आयोजित करणेस तसेच सदर विषय कायम होणेची वाट न पाहता अंमलबजावणी करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

**विषय क्रमांक २** – १.सन्मा.सदस्य सचिन चिखले यांचा दिनांक ०६/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.
२. सन्मा.सदस्य उत्तम केंदळे यांचा दिनांक ०६/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

१. दुर्गानगर चौक या ठिकाणी जीर्ण झालेली मुतारी काढून टाकण्याबात.
२. राहुलनगर से.२२ या ठिकाणी असलेली मुतारी काढून टाकण्याबाबत.

**विषय क्रमांक ३** – १.सन्मा.सदस्य उत्तम केंदळे यांचा दिनांक ०६/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

प्र.क्र.१३ मधील यमुनानगर येथील जलतरण तलाव व तेथील परिसरातील असलेली मोडकळीस आलेली इमारत पाडून तेथे फ क्षेत्रिय कार्यालय इमारत बांधणेबाबत.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

---

विषय क्रमांक-१
दिनांक-०६/०१/२०२२
सूचक-उत्तम केंदळे

ठराव क्रमांक-४
विभाग- सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक-सुमनताई पवळे

संदर्भ- सन्मा.सदस्य उत्तम केंदळे यांचा दिनांक ०६/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

इंदौर अभ्यास दौ-याबाबत झालेला फ प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक २ दिनांक २४/११/२०२१ मध्ये दुरुस्ती करणेत येऊन फ प्रभाग समिती सदस्य व फ प्रभागातील ३ अधिकारी/कर्मचारी यांचा पाहणी/अभ्यास दौ-याचे इंदौर हे ठिकाण बदलून त्या ऐवजी सिक्कीम, दार्जिलिंग,गंगटोक या ठिकाणी अभ्यास/ पाहणी दौरा माहे जानेवारी २०२२ या महिन्यात आयोजित करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदर विषय कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

सदरचा विषय सर्वानुमते मान्य करणेत आला.

---

विषय क्रमांक-२
दिनांक-०६/०१/२०२२
सूचक- सचिन चिखले /उत्तम केंदळे

ठराव क्रमांक-५
विभाग- सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक-उत्तम केंदळे/सुमनताई पवळे

१. सन्मा.सदस्य सचिन चिखले यांचा दिनांक ०६/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.
२. सन्मा.सदस्य उत्तम केंदळे यांचा दिनांक ०६/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

१. दुर्गानगर चौक या ठिकाणी जीर्ण झालेली मुतारी काढून टाकण्यात यावी. या परिसरात मोठया प्रमाणात दुर्गंधी पसरलेली आहे, नागरि कांना त्रास होतो त्यामुळे तेथील मुतारी काढून टाकणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

२. राहुलनगर सेक्टर २२ या ठिकाणी असलेली मुतारी काढून टाकणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा विषय सर्वानुमते मान्य करणेत आला.

---------------------------------------------

विषय क्रमांक-३
दिनांक-०६/०१/२०२२
सूचक- उत्तम केंदळे

ठराव क्रमांक-६
विभाग- सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक-सुमनताई पवळे

संदर्भ-सन्मा.सदस्य यांचा दिनांक ०६/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

प्र.क्र.१३ मधील यमुनानगर येथील जलतरण तलाव व तेथील परिसरातील असलेली इमारत मोडकळीस आलेली असून ती धोकादायक झालेली आहे. तरी सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन सदर इमारत पाडणेत यावी तसेच जलतरण तलाव काढून टाकून त्या ठिकाणी फ क्षेत्रिय कार्यालयाकरिता सुसज्ज इमारत बांधणेचे प्रस्तावास तसेच सदर कामकाजाकरिता अनुभवी सल्लागार नेमणूक करुन कामकाज तातडीने करुन घेणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा विषय सर्वानुमते मान्य करणेत आला.

---------------------------------------------

तद्नंतर मा.कुंदन अंबादास गायकवाड, सभापती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून प्रस्तुतची सभा संपल्याचे जाहीर केले.

K.A Gaikwad

(कुंदन अंबादास गायकवाड)
सभापती
फ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक- फक्षेका/सभा/कावि/02/2022 दिनांक- 06 /01/2022

(महेंद्र चौधरी)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
फ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ----------------------